**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०६ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची दूरस्थ पद्धतीनं पायाभरणी आणि उद्घाटन.
2. मस्साजोगच्या सरपंच हत्येप्रकरणी निःपक्षपाती तपासाची सर्वपक्षीय नेत्यांची राज्यपालांकडे मागणी.
3. कर्नाटकात आढळले एचएमपीव्हीचे दोन रुग्ण; मुख्यमंत्री फडणवीसांचं अफवांपासून लांब राहण्याचं जनतेला आवाहन.
4. महावितरणच्या नागपूर परिमंडलानं वर्ष 2024 मध्ये दिले तब्बल 73 हजार 897 लघुदाब ग्राहकांना दिले नवीन वीज जोड.

---------------------------------------

**मोदी रेल्वे प्रकल्प**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन आज दूरस्थ पद्धतीनं केलं. काश्मीर ते कन्याकुमारी दळणवळण आणि पायाभूत सुविधा विकासाला चालना देणाऱ्या या प्रकल्पांमधे नव्या जम्मू रेल्वे विभागाचा समावेश आहे. तेलंगणातल्या नवीन चार्लापल्ली टर्मिनसचं उद्घाटन आणि पूर्व किनारपट्टी रेल्वेच्या रायगड रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. पायाभूत सुविधांच्या माध्यमातून देश जोडला जात असल्याचं मोदी यांनी भाषणात सांगितलं. रेल्वे तसंच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, तसंच मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला, तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी तसंच या दोन्ही राज्यांचे राज्यपाल इत्यादी मान्यवरांनी कार्यक्रमात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून भाग घेतला. दळणवळणाच्या सुविधा विकसित होत असल्याबद्दल या राज्यांचं मोदी यांनी आपल्या भाषणात अभिनंदन केलं.

---------------------------------------

**सडक सुरक्षा**

नियम न पाळल्यामुळे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या अपघातांवर आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सुरक्षा संबंधी सडक सुरक्षा अभियान 2025 या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे आयोजित कार्यक्रमात चर्चा केली. यावेळी मोठ्या संख्येने शाळकरी मुलं, प्राध्यापक आणि संबंधित संस्थांतील व्यक्ती उपस्थित होत्या. यावेळी लहान मुलांच्या विशिष्टता शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेविषयी आकडेवारी बद्दल सांगताना गडकरी म्हणाले की ....

*सबसे दुर्भाग्यपूर्ण बात है जो यहाँ टीचर्स भी है, और ये सन्देश जिन प्राचार्य और मुख्याध्यापक तक जाएगा, स्कूल एंड इंस्टिट्यूशनल एरिया में स्कूल के और कॉलेज के बाजू में 10 हजार मौतें हुई है, तो स्कूल में जाने के लिए, बाहर निकालने के लिए, रोड क्रॉसिंग के लिए। उनके प्लानिंग में उनको सोचना पड़ेगा और फिर इन बच्चों की जान बच सकेगी।*

---------------------------------------------

मराठी पत्रकारिता दिवस

मराठी पत्रकारिता दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आणि त्यांनी दर्पण हे पहिलं मराठी नियतकालिक सुरू केलं तो दिवस म्हणजेच ६ जानेवारी दरवर्षी मराठी पत्रकारिता दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी पत्रकार संघानं काल मुंबईत महाराष्ट्राच्या पहिल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकॅथॉनचं आयोजन केलं होतं. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यावेळी उपस्थित होते. पत्रकार संघटनेने यावर्षीच्या पत्रकार दिनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्यवेधी संकल्पना निवडली आहे. पत्रकार दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना आदरांजली वाहिली आहे. पत्रकारितेमध्ये मूल्य जोपासले गेले पाहिजे. या मूल्यांच्या बळावरच समृद्ध पत्रकारिता करता येते. पत्रकारांच्या लेखणीमधूनच अशा विविध सामाजिक समस्यांना वाचा फोडली जाते, असा सूर पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात निघाला. वाशीम जिल्हा माहिती कार्यालयातही पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आज यवतमाळ इथल्या श्रमिक पत्रकार संघटनेच्या वतीने बाळशास्त्री जांभेकर पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक ऊईके प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

---------------------------------------------

**सर्वपक्षीय शिष्टमंडळ**

**बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी निःपक्षपाती तपासाची मागणी घेऊन सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळाने आज मुंबईत राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतली. तपास पूर्ण होईपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा तसंच वाल्मिक कराड याच्यावर हत्येचा गुन्हा नोंदविला जावा तसेच तपास पथकात निष्पक्ष अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची मागणी शिष्टमंडळानं केली.**

**----------------------------------------**

**एचएमपीवी व्हायरस**

**कर्नाटकात ह्युमन मेटान्यूमो व्हायरस एचएमपीव्हीचे दोन रुग्ण आढळले आहेत. यात तीन महिन्याच्या मुलीचा आणि आठ महिन्यांच्या मुलाचा समावेश आहे. दोघांवर उपचार सुरू असून बाधित रुग्णांपैकी एकानंही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही. विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसनाच्या आजाराचे रुग्ण सापडत आहेत. देशात इन्फ्लूएंझासदृश आजार किंवा गंभीर तीव्र श्वसन आजारात वाढ झालेली नाही. देशात श्वसनाच्या आजारांमध्ये होणारी संभाव्य वाढ हाताळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचं तसंच परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सांगितलं. चीनमध्ये एचएमपीव्हीच्या वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटना वेळोवेळी अद्ययावत माहिती देत आहे. दरम्यान, एचएमपीव्ही वायरसबद्दल लोकांनी घाबरून जाऊ नये, तसंच अफवा किंवा ऐकीव माहितीवर विश्वास ठेवू नये, त्याचबरोबर माध्यमांनी देखील कपोलकल्पित माहिती न देता ठोस आणि योग्य तीच माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाच्या सूचनांप्रमाणे राज्य सरकार देखील त्यावर कार्य करेल, अशी माहिती त्यांनी दिली.**

**----------------------------------------**

**बावनकुळे**

**उद्धव ठाकरे हे सामनामधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करतात, हा मोठा विनोदच म्हणावा लागेल. 'विलासी' असा आरोप करणाऱ्यांनी पंतप्रधान मोदींचा जीवनप्रवास बघावा. मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखालीच देशाचा विकास होत आहे. मोदींनी त्यांच्या राजकीय आणि वैयक्तिक आयुष्यात कायमच साधेपणा जपला आहे. त्यांच्या नेतृत्वात भारताचे जागतिक स्थान उंचावले गेले**

आहे, याचा तुम्हाला खरा त्रास होत आहे, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात आयोजित एका पत्रकार परिषदेत बोलताना केली. दरम्यान भाजपच्या सदस्य नोंदबद्दल ते म्हणाले की..

*दीड कोटी सदस्यसंख्या असलेला पक्ष आम्ही या ठिकाणी सदस्य नोंदणीच्या माध्यमातन करण्याचा प्रयत्न आमचा आहे. आम्हाला ३ कोटी ११ लक्ष मत मिळाली आहे आणि आम्हाला विश्वास आहे की जनतेने मोदींच्या नेतृत्वात आम्हाला या ठिकाणी मोठे यश आम्हाला दिलेला आहे. देवेंद्रजी या ठिकाणी यशस्वी मुख्यमंत्री म्हणून आमच्या महाराष्ट्राचे नेते आहेत. मला असं वाटतं मोदी आणि देवेंद्र यांच्या नेतृत्वामध्ये आपल्याला डबल इंजिन सरकार आहे. या डबल इंजिन सरकारवर जनतेचा विश्वास आहे. आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात जनताही भारतीय जनता पार्टीच्या सदस्यता घेण्याकरता मोठ्या प्रमाणावर आमच्याकडे येत आहे.*

-----------------------------------------

खासदार भजन स्पर्धा

केंद्रीय मंत्री  नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून उद्या दि. ७ जानेवारीपासून खासदार भजन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. ११ जानेवारीपर्यंत नागपुरातील सहा विधानसभा क्षेत्रांमध्ये ही स्पर्धा होणार आहे. उद्या मध्य नागपुरात श्री संत कोलबा स्वामी सभागृह, मंगळवारी येथे सेवासदन संस्थेच्या अध्यक्ष कांचनताई गडकरी आणि अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस गुरुकुंज मोझरीचे जनार्दनपंत बोथे गुरुजी यांच्या विशेष उपस्थितीत खासदार भजन स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

-----------------------------------------

नवीन वीज जोडणी

केंद्र सरकारच्या 'इज ऑफ लिव्हिंग' निर्देशांकानुसार ग्राहक सेवा प्रदान करताना, महावितरणच्या नागपूर परिमंडलाने 1 जानेवारी 2024 ते 31 डिसेंबर 2024 या कालावधीत तब्बल 73 हजार 897 लघुदाब ग्राहकांना नवीन वीज जोड दिले आहेत. नागपूर परिमंडलात ‘इज ऑफ लिव्हींग’ या संकल्पनेनुसार वीज ग्राहकांना तातडीने सेवा दिल्या जात आहेत. यात मागील वर्षभरात नागपूर शहर मंडलातील 42 हजार 607, नागपूर ग्रामीण मंडलातील  19 हजार 136 आणि वर्धा मंडलातील 12  हजार 154 लघुदाब ग्राहकांना नवीन वीज जोडण्या दिल्या

गेल्या आहेत. यात नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक 11 हजार 622 वीज जोडण्या या काँग्रेस नगर विभागात तर त्याखालोखाल महाल विभागात 8 हजार 880 वीज जोडण्या देण्यात आल्या.

-----------------------------------------

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं वर्तवलेल्या अंदाजानुसार विदर्भात हवामान कोरडे राहणार असून आज सर्वात कमी तापमानाची नोंद नागपूरमध्ये 11 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली, तर सर्वात जास्त तापमान अकोला आणि ब्रह्मपुरी येथे 33 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस होते. विदर्भात अजूनही थंडी जाणवत असून आज गोंदिया, वर्धा आणि अमरावती इथं 11.9 दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान 12 ते 17 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचलं. नागपुरात आज सकाळपासून अधून मधून ढगाळ वातावरण असल्याने किमान तापमानात किंचित वाढ नोंदवण्यात आली आहे. दरम्यान, उत्तर आणि पूर्व भारतात थंडीची लाट कायम असून तापमानात घट झाली आहे. दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यामुळे रेल्वे आणि विमान उड्डाण उशिरानं होत आहेत.

-----------------------------------------